ICE 'n' SPICE
व्हेज रेस्टॉरन्ट
पंजाबी डिश्रेस् । पावभाजी । चाईनीज । ज्युसेस् । आईस्क्रीम
गोदावरी कॉम्प्लेक्स,व्ही.आय.पी.रोड,नांदेड
मो. 9422172572, 9850430189

सायं दैनिक
# नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

●वर्ष २४ वे ● अंक २८४ ● सोमवार दि.१० ऑगस्ट २०२६ ● नांदेड ● पोस्ट परवाना/एनएनडी/आरएनपी-२६२/२०२६-२०२८ ● पाने ४ ● किंमत १ रु.

# हाणेगावच्या आश्रम शाळेत अन्नातून विषबाधा ; ३२ विद्यार्थ्यांची प्रकृती बिघडली

## बाधित विद्यार्थ्यांवर उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरु



देगलूर/प्रतिनिधी-तालुक्यातील हाणेगाव येथील वसंतराव नाईक निवासी आश्रमशाळेत विद्यार्थ्यांना देण्यात आलेल्या मांसाहारी भोजनातून विषबाधा झाल्याची गंभीर घटना उघडकीस आली आहे. रविवारी रात्री दिलेल्या जेवणानंतर काही वेळातच विद्यार्थ्यांना उलट्या, मळमळ व पोटदुखीचा त्रास सुरू झाला. पाहता पाहता अनेक विद्यार्थ्यांची प्रकृती खालावल्याने आश्रमशाळेत एकच गोंधळ उडाला.

या घटनेत एकूण ३२ विद्यार्थ्यांना त्रास झाल्याचे समोर आले असून त्यामध्ये २८ मुले व ४ मुलींचा समावेश आहे. सर्व बाधित विद्यार्थ्यांना तातडीने देगलूर येथील शासकीय उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तत्काळ उपचार सुरू केले असून बहुतेक विद्यार्थ्यांची प्रकृती स्थिर असल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे.

घटनेची माहिती मिळताच पालकांनी रुग्णालयात धाव घेतली. आपल्या मुलांच्या प्रकृतीबाबत चिंतेत असलेल्या पालकांनी आश्रमशाळा प्रशासनाविरोधात संताप व्यक्त केला. निवासी विद्यार्थ्यांच्या आहाराची जबाबदारी पूर्णपणे शाळेवर असताना अशा प्रकारची घटना घडणे अत्यंत गंभीर असल्याची प्रतिक्रिया त्यांनी दिली.

दरम्यान, भोजन व्यवस्थेवर मोठे प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. विद्यार्थ्यांसाठी शासनाकडून पुरेसा निधी उपलब्ध असतानाही अन्नाची गुणवत्ता, स्वच्छता व साठवणुकीबाबत आवश्यक ती दक्षता घेतली जाते का, याबाबत शंका व्यक्त होत आहे. काही पालकांनी भोजनात वापरलेल्या चिकनच्या दर्जाबाबतही प्रश्न उपस्थित केले असून संबंधित अन्ननमुने जप्त करून प्रयोगशाळेत तपासणी करण्याची मागणी केली आहे.

या प्रकरणी आश्रमशाळेचे अधीक्षक, मुख्याध्यापक, स्वयंपाकघरातील कर्मचारी तसेच भोजन समिती यांची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे. विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी संबंधित हा गंभीर प्रकार असल्याने दोषी आढळल्यास निलंबनासह कायदेशीर कारवाई करावी, अशी भूमिका पालकांनी मांडली आहे. निवासी शाळांमध्ये विद्यार्थ्यांना सुरक्षित व सकस आहार मिळावा, हा पालकांचा मूलभूत विश्वास या घटनेमुळे डळमळीत झाला आहे. त्यामुळे संबंधित विभागाने तातडीने चौकशी करून संपूर्ण भोजन व्यवस्थेचे ऑडिट करावे, स्वयंपाकघर व अन्नसाठ्याची तपासणी करावी आणि भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी कडक उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# शरद पवारांच्या खासदारांची पंतप्रधानांशी अर्धातास भेट

## भारतरत्नसह शेतकरी मदतीच्या मागण्यांवर चर्चा

नवी दिल्ली:शरद पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेसच्या (शरद पवार गट) आठ खासदारांनी आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची नवी दिल्लीत सदिच्छा भेट घेतली. खासदार सुप्रिया सुळे यांच्या नेतृत्वाखालील या शिष्टमंडळासोबत पंतप्रधानांनी सुमारे २५ ते ३० मिनिटे सविस्तर चर्चा केली. या भेटीत मतदारसंघातील विविध प्रलंबित प्रश्न, राज्यातील पूरस्थिती आणि शेतकऱ्यांच्या नुकसानीसह महाराष्ट्रातील महापुरुषांना भारतरत्न देण्याची मागणी यावर विशेष भर देण्यात आला.

बैठकीदरम्यान खासदारांनी अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे झालेले मोठ्या प्रमाणातील नुकसान मांडत तातडीने आर्थिक मदत देण्याची मागणी केली. शेतमालाला योग्य व हमीभाव मिळावा, तसेच मतदारसंघातील प्रलंबित विकासकामांना गती द्यावी, यासाठी केंद्र सरकारकडून आवश्यक सहकार्य मिळावे, अशी मागणीही यावेळी करण्यात आली. विकासकामांसाठी निधीवाटपाचा मुद्दाही खासदारांनी पंतप्रधानांसमोर मांडला. यावेळी राष्ट्रवादीच्या शिष्टमंडळाने महाराष्ट्रातील चार महान व्यक्तिमत्त्वांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्काराने सन्मानित करण्याची आग्रही मागणी केली. समाजसुधारक महात्मा ज्योतिराव फुले, स्त्री शिक्षणाच्या प्रणेत्या क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांना देशाच्या सर्वोच्च नागरी सन्मानाने गौरवावे, असे निवेदन पंतप्रधानांना सुपूर्द करण्यात आले. दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट एनडीएमध्ये सहभागी होणार असल्याच्या चर्चांना या भेटीमुळे अधिक उधाण आले आहे. मात्र, या भेटीला सदिच्छा भेट असल्याचे सांगण्यात आले असून राजकीय अर्थ काढण्याबाबत अधिकृत स्तरावर कोणतीही भूमिका स्पष्ट करण्यात आलेली नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी खासदारांनी मांडलेल्या सर्व मागण्या गांभीर्याने ऐकून घेत सकारात्मक पावले उचलण्याचे आश्वासन दिल्याची माहिती सूत्रांनी दिली.

## रांचीत विद्यार्थ्यांवर लाठीचार्ज

रांची:झारखंड लोकसेवा आयोग आणि झारखंड कर्मचारी निवड आयोग (जेएसएससी) भरतीमध्ये झालेल्या कथित घोटाळ्या विरोधात आणि पेपरफुटी विरोधात सुरू असलेलं आंदोलन आता पेटल्याचं चित्र आहे. विद्यार्थ्यांच्या 'विधानसभा मार्च'दरम्यान प्रचंड गदारोळ झाला असून पोलिसांनी विद्यार्थ्यांविरोधात लाठीचार्ज केला. विधानसभेला घेराव घालण्यासाठी आलेल्या विद्यार्थ्यांवर ***पान ४ वर***

## जिल्हा बँकेच्या अध्यक्षपदी आ.डॉ.तुषार राठोड तर उपाध्यक्षपदी डॉ.मिनल खतगावकर



नांदेड/प्रतिनिधी-नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या अध्यक्षपदी आ.डॉ.तुषार राठोड तर उपाध्यक्षपदी डॉ.मिनल पाटील खतगावकर यांची आज (सोमवार) बिनविरोध निवड करण्यात आली.

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या अध्यक्ष व उपाध्यक्षपदासाठी गेल्या दोन दिवसांपासून खलबते चालू होते. अध्यक्षपदासाठी मारोतराव कवळे गुरुजी व माधवराव पाटील जवळगावकर यांच्या नावाची चर्चा सुरु झाली होती. मारोतराव कवळे गुरुजी यांचे नाव शेवटपर्यंत आघाडीवर होते. माजी मुख्यमंत्री खा. अशोक चव्हाण यांनी रविवारी संचालकाचे व सर्वपक्षीय नेत्यांचे म्हणणे ऐकुन घेतले. परंतु अध्यक्ष व उपाध्यक्षपदाच्या नावावर शिक्कामोर्तब केला नव्हता. रविवारी सायंकाळपासूनच मुखेडचे भाजप आ.डॉ.तुषार राठोड यांचे नाव चर्चेत आले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जिल्हा बँकेच्या अध्यक्षपदासाठी आ.डॉ.तुषार राठोड यांच्या नावाला संमती दिल्यानंतर कवळे गुरुजी यांचे नाव अखेरच्या क्षणी कटले. उपाध्यक्षपदासाठी डॉ.मिनल पाटील खतगावकर व प्रणिता देवरे चिखलीकर यांच्यात चुरस होती. शेवटी उपाध्यक्षपदासाठी डॉ. मिनल पाटील खतगावकर यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आला. आज (सोमवार) दुपारी अध्यक्षपदासाठी आ.डॉ. तुषार राठोड व उपाध्यक्षपदासाठी डॉ. मिनल पाटील खतगावकर यांनी प्रमुख पदाधिकारी व संचालकांसमवेत उमेदवारी अर्ज दाखल केला. दोन्ही पदासाठी एक-एक अर्ज असल्याने निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी जिल्हा बँकेच्या अध्यक्षपदी आ.डॉ.तुषार राठोड तर उपाध्यक्षपदी डॉ.मिनल पाटील खतगावकर यांची निवड झाल्याचे जाहीर केले. यावेळी आ.प्रताप पाटील चिखलीकर, आ.भीमराव केराम, आ.अमरनाथ राजूरकर, आ.राजेश पवार, माजी आ.माधवराव पाटील जवळगावकर, माजी आ.ओमप्रकाश पोकर्णा, बी.आर.कदम, मारोतराव कवळे गुरुजी, श्रीनिवासराव चव्हाण, दत्तात्रय रेड्डी, पुनमताई पवार, संगिता विठ्ठल पाटील, प्रणिता देवरे चिखलीकर, कैलाश गोरठेकर, राजेंद्र केशवे, अनिल पाटील बाभळीकर, सुशीलाताई बेटमोगरेकर यांच्यासह बँकेचे संचालक, विविध पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.


# इंदरजितसिंघ बावरी खून प्रकरणी बिगानीया टोळीतील पाच जणांना अटक



नांदेड/प्रतिनिधी-इंदरजितसिंघ बावरी खून प्रकरणी स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाच्या पोलीसांनी बिगानीया टोळीतील चार जणांना तसेच एका विधीसंघर्षग्रस्त बालकास अटक केली आहे.

शनिवार दि.८ ऑगस्ट रोजी दुपारी फायनान्स वसुलीचे काम करणाऱ्या इंदरजितसिंघ बावरी व त्याचा चुलत भाऊ हे दोघेजण दुचाकीवर सिडको भागात गेले होते. धनेगावकर पेट्रोल पंपाजवळ पेट्रोल भरण्यासाठी इंदरजितसिंघ बावरी व त्याचा चुलत भाऊ हे दोघेजण थांबले होते. त्याठिकाणी नितीन बिगानीया, दिलीप डाकोरे, किन्ना परदेशी व त्याचे इतर साथीदार दुचाकीवर आले. पुर्ववैमनस्यातून इंदरजितसिंघ बावरी व त्याच्या भावास शिवीगाळ करत आरोपींनी हल्ला केला. इंदरजितसिंघ बावरी याच्यावर खंजरने वार केल्याने तो गंभीर जखमी झाला. त्याचा चुलत भाऊ जीव वाचविण्यासाठी घटनास्थळावरुन पळून गेला. त्यानंतर आरोपी हे दुचाकीवर बसून फरार झाले. घटनेची माहिती पोलीसांना व बावरी याच्या मोठ्या बंधुस समजताच ते घटनास्थळी दाखल झाले. गंभीर जखमी असलेल्या इंदरजितसिंघ बावरी यास उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी त्यास मृत घोषीत केले. ***पान ४ वर***

# माहूरच्या आदिवासी मुलांचे वसतिगृह की,नरकयातना ? ;कोट्यवधींच्या योजनांचा लाभ नेमका कुणाला ?



**सरफराज दोसानी**
**माहूर**
**स्पॉट पंचनामा**

माहूर: आदिवासी विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शासन कोट्यवधी रुपये खर्च करीत असल्याचा दावा केला जातो. मात्र, माहूर शहरातील शासकीय आदिवासी मुलांच्या वसतिगृहाची प्रत्यक्ष परिस्थिती पाहिली असता या दाव्यालाच धक्का बसणारे चित्र समोर येते. ७५ विद्यार्थ्यांची क्षमता असलेल्या या वसतिगृहात राहण्यासच विद्यार्थी अनुत्सुक असल्याची परिस्थिती निर्माण झाली असून, जीर्ण भाड्याची इमारत, अस्वच्छता, मूलभूत सुविधांचा अभाव, पिण्याच्या पाण्याची समस्या आणि भोजनाच्या दर्जाबाबतच्या तक्रारींमुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

शिक्षणासाठी घरापासून दूर आलेल्या आदिवासी विद्यार्थ्यांना सुरक्षित, स्वच्छ आणि आरोग्यदायी निवास मिळणे ही शासनाची जबाबदारी आहे.परंतु माहूरच्या वसतिगृहातील परिस्थिती पाहता शासकीय योजना विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचत आहेत की, केवळ कागदोपत्री त्यांचा लाभ दाखविला जात आहे? असा सवाल पालक आणि नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. माहूर शहरातील प्रभाग क्रमांक १ मध्ये एका भाड्याच्या इमारतीत आदिवासी मुलांचे हे वसतिगृह सुरू आहे. इमारतीची अवस्था जीर्ण असून परिसरात अस्वच्छता असल्याचे चित्र आहे. विद्यार्थ्यांसाठी आवश्यक असलेल्या मूलभूत सुविधांचीही वानवा असल्याच्या तक्रारी आहेत. वसतिगृहाचा उद्देशच ग्रामीण आणि दुर्गम भागातील गरीब आदिवासी विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आधार देणे हा आहे. मात्र, ज्या मुलांसाठी शासनाने ही व्यवस्था उभी केली, त्यांनाच येथे राहणे गैरसोयीचे वाटत असेल, तर योजनेच्या यशाचे मोजमाप नेमके कशावर करायचे? हा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. वसतिगृहातील गैरसोयींमुळे काही विद्यार्थी गावाकडे परतण्याच्या मनःस्थितीत असल्याची माहिती समोर येत आहे. शिक्षणासाठी घरापासून दूर आलेल्या विद्यार्थ्यांना जर सुरक्षित निवासासाठी संघर्ष करावा लागत असेल, तर ही बाब केवळ व्यवस्थापनाचा प्रश्न न राहता त्यांच्या शैक्षणिक भवितव्याशी निगडित गंभीर विषय ठरतो.

या वसतिगृहासाठी वापरल्या जाणाऱ्या इमारतीचे भाडे तब्बल नऊ वर्षांपासून थकीत असल्याची माहिती समोर आली आहे. थकीत भाड्याचा मोबदला मिळण्यासाठी आवश्यक कागदपत्रांशी संबंधित तांत्रिक अडचणी असल्याचे सांगितले जाते. मात्र, प्रश्न असा आहे की,नऊ वर्षे भाडे थकीत राहण्यामागे नेमकी अडचण काय? प्रशासनाने ती दूर करण्यासाठी कोणती पावले उचलली? आणि विद्यार्थ्यांसाठी पर्यायी किँवा कायमस्वरूपी इमारतीची व्यवस्था का करण्यात आली नाही?या प्रश्नांची उत्तरे आता प्रशासनाला द्यावी लागणार आहेत. महाराष्ट्र विधान-मंडळाच्या अनुसूचित जमाती कल्याण समितीचा नांदेड जिल्हा दौरा १० ते १२ ऑगस्टदरम्यान होणार आहे. त्यामुळे माहूरच्या आदिवासी मुलांच्या वसतिगृहाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. समितीने केवळ कार्यालयीन अहवाल आणि कागदपत्रांवर विसंबून न राहता थेट वसतिगृहात जाऊन पाहणी करावी, विद्यार्थ्यांशी स्वतंत्रपणे संवाद साधावा, भोजन, पाणी, स्वच्छता, निवासव्यवस्था आणि इमारतीची प्रत्यक्ष स्थिती तपासावी, अशी मागणी आदिवासी समाजाचे युवा कार्यकर्ते विनोद खुपसे यांनी केली आहे. ***पान ४ वर***

## प्रमाणपत्र वादाने पेटले आरक्षण



**मराठा आरक्षणाचा प्रश्न आधीच गुंतागुंतीचा असताना, मराठवाड्यातील दोन जणांची कुणबी/मराठा प्रमाणपत्रे पडताळणी समितीने रद्द केल्यामुळे हा वाद आणखी चिघळला आहे. या निर्णयाने केवळ संबंधित व्यक्तींनाच धक्का बसलेला नाही, तर संपूर्ण समाजात अस्वस्थता निर्माण झाली आहे. आरक्षणाच्या आधारासाठी वापरल्या जाणाऱ्या प्रमाणपत्रांच्या वैधतेवरच प्रश्नचिन्ह उभे राहिल्याने हा मुद्दा अधिक संवेदनशील बनला आहे.या पार्श्वभूमीवर मराठा आरक्षणासाठी आंदोलन करणारे मनोज जरांगे पाटील यांनी अत्यंत तिखट शब्दांत राज्य सरकारवर हल्लाबोल केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर त्यांनी थेट निशाणा साधत सरकारच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित केले. ''समाजाशी अन्याय सहन केला जाणार नाही,'' असा इशारा देत त्यांनी पुन्हा आंदोलन छेडण्याचा इरादा जाहीर केला आहे. प्रमाणपत्र पडताळणी समितीच्या निर्णयामुळे आरक्षणाच्या प्रक्रियेतील त्रुटी अधोरेखित झाल्या आहेत. जर प्रमाणपत्रेच वैध ठरत नसतील, तर आरक्षणाच्या संपूर्ण यंत्रणेबाबत शंका निर्माण होणे स्वाभाविक आहे. यामुळे हजारो युवकांच्या भवितव्यावर अनिश्चिततेची छाया पडू शकते. एकीकडे न्यायालयीन बंधने आणि दुसरीकडे सामाजिक दबाव, या दोन्हींच्या कात्रीत सरकार सापडले आहे. या प्रश्नाचा सामाजिक परिणामही गंभीर आहे. मराठा आणि ओबीसी समाजांमध्ये आधीच निर्माण झालेला तणाव वाढण्याची शक्यता आहे. आरक्षणाच्या वाटपावरून निर्माण होणारे मतभेद समाजातील सलोख्याला बाधा पोहोचवू शकतात. त्यामुळे हा मुद्दा केवळ प्रशासकीय किंवा कायदेशीर मर्यादेत न राहता सामाजिक स्थैर्याशी निगडित ठरतो.राजकीय पातळीवरही या घडामोडींना मोठे महत्त्व प्राप्त झाले आहे. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर हा प्रश्न अधिक तापण्याची चिन्हे आहेत. आंदोलन, आरोप-प्रत्यारोप आणि आश्वासनांचा सिलसिला वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. मात्र, केवळ राजकीय फायद्यासाठी या प्रश्नाचा वापर होऊ नये, हीच जनतेची अपेक्षा आहे. या परिस्थितीत सरकारने तातडीने ठोस पावले उचलणे आवश्यक आहे. प्रमाणपत्र पडताळणी प्रक्रियेत पारदर्शकता आणि एकसंधता आणणे गरजेचे आहे. तसेच, न्यायालयीन चौकटीत राहून टिकणारा आणि सर्व समाजघटकांना न्याय देणारा तोडगा शोधणे ही काळाची गरज आहे. संवाद, समन्वय आणि दूरदृष्टी यांचा संगम साधला तरच या पेचातून मार्ग निघू शकतो. एकंदरीत, मराठा आरक्षणाचा प्रश्न आता नव्या टप्प्यावर पोहोचला आहे. प्रमाणपत्र रद्द प्रकरणाने या आंदोलनाला नवी धार मिळाली आहे. सरकारने याकडे केवळ प्रशासकीय समस्या म्हणून न पाहता सामाजिक जबाबदारी म्हणून पाहणे आवश्यक आहे. अन्यथा, हा वाद आणखी भडकून राज्याच्या सामाजिक समतोलावर परिणाम होण्याची भीती आहे. आता निर्णयाचा क्षण आहे; आणि तो निर्णय न्याय्य, स्पष्ट आणि टिकाऊ असायलाच हवा.**

# ऑगस्ट क्रांती दिन चिरायू होवो!



अंकुश शिंगाडे
नागपूर

भारताला स्वातंत्र्य सहजासहजी मिळालं नाही,त्यासाठी इथे भारतीय नेत्यांना फार मोठा त्याग करावा लागला.कित्येक क्रातीकारक लढले.शहीद झाले.काहींची नावं इतिहासात नाहीत. काहींची आहेत. पण जे जे या देशासाठी लढले.त्यांच्या प्राणांच्या बलिदानाचा इतिहास भारत देश विसरू शकत जरी नसला तरी आजही काही लोकँ त्यांना शिव्या हासडतांना दिसतात.ही या देशाची शोकांतिका आहे. निदान आपण तरी या देशाच्या स्वातंत्र्यासाठी काही करु शकलो नाही.आताही करण्यासारखे असूनही करु शकत नाही.हे सगळं विसरुन त्यांना शिव्या देण्याचं नव्हे तर बदनाम करण्याचं काम नेहमी काही लोकं करीत असतात.

खरं तर नऊ ऑगस्ट हा क्रांती दिन म्हणून इतिहासात प्रसिद्ध आहे.पण असे असले तरी या दिवसासाठी आठ ऑगस्टलाही जास्त महत्व आहे.याच दिवशी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने मुंबई मध्ये एक प्रस्ताव पारित केला.त्या प्रस्तावानुसार नऊ ऑगस्टपासून आपण चलेजाव भारत छोडोचं आंदोलन करु असं ठरलं.प्रत्येक नेत्यांनी रस्त्यावर उतरुन अहिंसक मार्गाने स्वातंत्र्याचा उठाव करु असं ठरलं.त्याला कारणंही तसंच होतं. १९३९ ला द्वितीय महायुद्ध सुरु झालं.त्या महायुद्धात जर्मन फौजांनी इग्लंडवर सरशी केली.त्यावेळी येथील भारतीय नेत्यांना इंग्रजांनी म्हटलं होतं की तुम्ही आम्हाला मदत करा.बदल्यात आम्ही तुम्हाला स्वातंत्र्य देवू.पण ज्यावेळी युद्ध संपलं,तेव्हा त्या इंग्रजांनी भारतीयांना दगा देत त्या स्वातंत्र्य देण्यापासून माघार घेतली.त्यामुळं पर्यायानं भारतीय नेत्यांची मनं नाराज झाली.म्हणून त्यांनी चलेजावचा उठाव करण्याचं ठरवलं.

या संदर्भात आठ ऑगष्टला भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची बैठक होण्यापुर्वी त्याच भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची बैठक चार ऑगष्टला झाली.आपल्याला इंग्रजांनी धोका दिला या विषयावर ती बैठक होती.आपण अहिंसक मार्गानं उद्या रस्त्यावर उतरु हेही विषय होते.परंतू याला बैठकीतील काही लोकांची सहमती झाली नाही.त्यातच काँग्रेसचे जेष्ठ नेते सी राजगोपालाचारी यांनी याच विषयाच्या संदर्भात पार्टी सोडली.त्यामुळं चार ऑगष्टला झालेली बैठक निष्फळ झाली.त्यामुळं त्याच्याच चार दिवसानं म्हणजे आठ ऑगष्टला परत बैठक भरली.तिही याच विषयावर. या बैठकीतही हाच विषय होता.पण याही बैठकीत हिंदू महासभा,मुस्लिम लीग व भारतीय कम्युनिस्ट पक्षीने विरोध केला.त्यांचं म्हणणं होतं की अहिंसक मार्गानं जरी आपण आंदोलन करीत असलो तरी इंग्रज आपल्याला सोडणार नाहीत.ते आंदोलन दडपवून टाकण्यासाठी बळाचा वापर करतील गोळ्या झाडतील.मग त्यात कित्येक भारतीय लोकँ मरतीय.म्हणून हो आंदोलन नको.पण आंदोलन जर केलं गेलं नाही तर या देशातून इंग्रज कधीच जाणार नाही असं तत्कालीन भारतीय नेत्यांना वाटत असल्यानं त्यांनी काही संघटनांचा विरोध होवूनही आंदोलन छेडलं.आठ ऑगष्टला प्रस्ताव पारित झाला व नऊ ऑगष्टला आंदोलनाला सुरुवात झाली. हे आंदोलन भारतीयांसाठी नवं नव्हतं.यापुर्वीही दहा मे १८५७ ला देशात असंच आंदोलन झालं होतं.तो १८५७ चा राष्ट्रीय उठाव म्हणून प्रसिद्ध आहे.यात बहादूरशहा जफर, नानासाहेब,राणी लक्ष्मीबाई,झलकारीबाई,व तात्या टोपे यांचे विशेष योगदान आहे.तो इतिहास येथील भारतीयांना माहित होता. तसेच तंट्या भील उर्फ भीमा नायक, चंद्रशेखर आझाद,भगतसिंह,राजगूरू, सुखदेव यांना देश विसरला नव्हता.त्यांनी केलेलं प्राणांच बलिदान येथील भारतीयांच्या रक्तात होता.याच बलिदानाचा इतिहास आळवू आळवू देश गांधीजींच्या नेतृत्वात एकत्र झाला होता.मग कित्येक नेते लढले.नेत्यांची धरपकड होताच साता-यात नाना पाटील,नागपूरमध्ये मगनलाल बागडी, सेलोकर गुरुजी यांनी मोर्चा सांभाळला.तसेच यामध्ये बरीच मंडळी शहीदही झाली. तसेच चिमूरमध्येही बरीच मंडळी शहीद झाली.

१८५७ ते १९४२ पर्यंतचा इतिहास रक्तरंजितच होता.कित्येक भारतीय अहिंसक मार्गानं जरी इंग्रजांचा विरोध करीत असले तरी ते गोळ्या झाडत असत.सायमन कमीशनमध्ये लाला लजपतराय यांनी सायमन गो बैक म्हणत मिळवणूक काढताच त्यांना लाठीमार करुन घायाळ केलं होतं,त्यातच त्यांचा मृत्यू झाला. जालियनवाला बागेतही तेच घडलं.म्हणून आठ ऑगष्टला झालेल्या बैठकीत प्रस्ताव पारित झाल्यानंतर करो या मरो असा आदेश देत नेत्यांनी चलेजाव भारत छोड़ोचं आंदोलन छेडलं.ही भारतीयांची इंग्रजांना एक चपराकच होती.प्रस्ताव पारित होताच व उद्या आंदोलन छेडणार आहे हे माहित होताच इंग्रजांनी येथील भारतीय नेत्यांना कैद केलं.महात्माजींना पुण्याला आगाखान पैलेसमध्ये ठेवलं.नेहरू तसेच इतर नेत्यांनाही पकडून देशातल्या वेगवेगळ्या तुरुंगात ठेवलं.तेव्हा महात्मा गांधी म्हणाले की आता प्रत्येकजण नेता आहे.इंग्रजांना घाबरु नका.प्रतिकार करा.स्वतःला स्वतःचा नेता समजा.

शेवटी नऊ ऑगष्टपासून सुरु झालेल्या अहिंसक आंदोलनाला पांगविण्यासाठी इंग्रज सैनिकांनी निरपराध भारतीयांवर जालियनवाला बागेसारखा गोळीबार केला.त्यात निरपराध माणसे मरण पावली.कित्येक आंदोलन करणारी आणि न करणारीही.त्यामुळं चिडून जावून येथील भारतीय लोकांनी टेलिफोनच्या तारा तोडल्या.कित्येक पोलिसठाणे जाळले.सरकारी इमारती जाळल्या.कित्येक लोकँ भुमीगत झाले. यात कित्येक विद्यार्थीही शहीद झाले.जेव्हा ही घटनेची माहिती महात्मा गांधींना झाली.त्यांनी तुरुंगातच एकवीस दिवसाचं उपोषण केलं.त्यातच त्यांचं स्वास्थ बिघडलं.त्यातच ते मरण पावतील व पुन्हा देशात रोष वाढेल याचा विचार करुन इंग्रजांनी त्यांना १९४४ मध्ये तुरुंगातून सोडले.

आंदोलन यशस्वी झाले नाही.मग काय भारतीय राष्ट्रीय काँग्रेसला हिंदू महासभा,वामपंथी दल व मुस्लिम लीग नावे ठेवू लागली.पण महत्वाचं सांगायचं झाल्यास १९४२ चं आंदोलन यशस्वी जरी झालं नसलं,१८५७ सारखं...तरी त्या झालेल्या आंदोलनातून इंग्रजांना एक शिक मिळाली.ती म्हणजे आता या देशातून गेल्याशिवाय उपाय नाही.त्यांनी त्यानंतर वेगवेगळ्या बैठका घेतल्या.ज्यांनी या आंदोलनाला मदत केली नाही.त्यांनाही विचारणा करुन शेवटी भारताला स्वातंत्र्य देण्याचा निश्चय केला.त्यात काही अटीही टाकल्या.बहुतेक आजही कोहीनूर भारताचा हिरा इंग्लंडमध्ये आहे.शंकुतला एक्सप्रेसचे पैसे आजपर्यंत इंग्लंडला जात होते.कदाचित अशाच तर अटी नव्हत्या इंग्रजांच्या की त्यांनी भारताला स्वातंत्र्य दिलं. या देशात हिंदू मुस्लिम भांडणं नसतांना इंग्रजांनी दोघांच्याही धर्म भावना भडकवून ज्या चाली चालल्यात.त्या चालीतून भारत पाकिस्तान बनला.तसेच अजूनही हा भारत पाकिस्तान वाद भारतात धुमसतच आहे.काल काश्मीर वाद होता.आज सीमावाद आहे.अन् आम्ही भारतीय कालही आपापसात लढत होतो.मी हिंदू मी मुस्लिम म्हणत.आजही लढतो.कोणत्याही देशात वाईट गोष्टी घडल्याच तर त्या ते ते धर्मीय मंडळी त्या त्या धर्मांनीच केल्या असे भांडतो नव्हे तर या देशाच्या एकात्मत्तेला तोडण्याचे काम करतो.

एवढंच नाही तर या देशातील शांतता भंग करतो.नेत्यांच्या आश्नासनात फसतो.नेत्यांबरोबर आपणही आपल्या महापुरुषांना शिव्या द्यायला लागतो.पण याचा विचार करीत नाही की त्या नेत्यांनी त्या काळात जे काही कार्य केले,ते अतुलनीय होते.ते नसते तर देश स्वातंत्र्यही झाला नसता.आपण गुलाम असतो इंग्रजांचे आणि आपली पिढीही गुलाम राहिली असती.देशाला स्नातंत्र्य कधीच मिळालं नसतं आजही.कारण कालच्या नेत्यात जी लढण्याची ताकद आहे.ती आजच्या नेत्यात दिसत नाही.हे नेते फक्त आश्वासन देवू शकतात.शिव्या हासडू शकतात.

# शब्दांच्या स्पंदनांना फुटले पंख;सृजनशीलतेच्या कोंदणात उमलली अभिव्यक्ती...

## ‘पीपल्स’कट्ट्यावर जुळला कवितेचा सूर, ‘जेन झी’च्या धगधगत्या आवाजाचीही उमटली चाहूल

**डॉ.विनोद चव्हाण**

नांदेड-काही शब्द मनातच राहतात काही ओठांवर येतात आणि काही शब्दांना जेव्हा स्वरांची साथ मिळते, तेव्हा त्यातून जन्माला येते कविता! अशाच शब्दांच्या स्पंदनांनी, भावनांच्या तरल लहरींनी आणि सृजनशीलतेच्या रंगांनी शनिवारी नांदेड एज्युकेशन सोसायटीच्या पीपल्स कॉलेजचा कॉलेज कट्टा अक्षरशः फुलून गेला. निमित्त होते कनिष्ठ महाविद्यालयातील मराठी वाङ्मय मंडळाच्या वतीने आयोजित काव्यमैफिलीचे. पुस्तकांच्या पानांमध्ये विसावलेले शब्द विद्यार्थ्यांच्या ओठांवर आले आणि त्यांच्या अभिव्यक्तीला टाळ्यांच्या कडकडाटाची उत्स्फूर्त साथ मिळाली.

व्यासपीठावर नांदेड एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष सीए डॉ. प्रवीण पाटील, जीएसटीचे सहाय्यक आयुक्त आनंद मुधोळकर, प्राचार्य डॉ. विकास सुकाळे, ज्येष्ठ साहित्यिक डॉ. मथुताई सावंत, नांदेड एज्युकेशन सोसायटीचे कार्यकारिणी सदस्य प्रा.विलास वडजे, डॉ. भगवान जाधव, डॉ.कल्पना जाधव, डॉ.मुकुंद कवडे, कार्यालयीन अधीक्षक रोहिदास आडे, ग्रंथपाल डॉ.संदीप गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती.कविता म्हणजे केवळ यमक जुळविणे नव्हे; ती मनाच्या स्पंदनांना शब्दांचे कोंदण देण्याची कला आहे, याचा प्रत्यय या मैफिलीत आला. कुणाच्या शब्दांत प्रेमाची हळवी चाहूल होती, कुणाच्या कवितेत सामाजिक वास्तवाचे अस्वस्थ करणारे प्रश्न होते, तर कुणाच्या स्वरांत देशभक्तीची धग होती. स्वरचित कवितांपासून नामांकित कवींच्या रचनांपर्यंत, शेरोशायरीपासून चारोळ्यांपर्यंत विविध साहित्यप्रकारांनी मैफिलीला बहुरंगी रूप दिले. कुसुमाग्रजांच्या शब्दांची वैचारिक धार, सुरेश भटांच्या कवितेतील भावस्पर्शी लय, तर कधी मंगेश पाडगावकरांची प्रेम कविता, विरह आणि माणूसपणाच्या भावनेला स्पर्श करणाऱ्या लोकप्रिय काव्यपंक्ती विद्यार्थ्यांनी आपल्या आवडत्या कवींच्या रचनांना आपल्या आवाजाचा आणि भावनेचा साज चढविला. काहींनी स्वरचित कवितेतून मनाचा आरसाच श्रोत्यांसमोर धरला.

अलीकडे दिल्लीच्या जंतर-मंतरवर चर्चेत आलेल्या जेन झीच्या आवाजातील धग नव्या पिढीच्या अभिव्यक्तीचे वेगळेच रूप अधोरेखित करते. त्याच पिढीची सृजनशील स्पंदने पीपल्स कॉलेजच्या कॉलेज कट्टयावरही जाणवली. मात्र येथे घोषणा नव्हत्या; शब्द होते, ओठांवर कविता होती आणि मनात व्यक्त होण्याची तीव्र आस होती. पहाडी आवाजात कविता सादर करणाऱ्या विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासाने आपले भावविश्व मांडले. त्यांच्या आवाजातील तरलता आणि शब्दांमधील आक्रमकता यांचा अनोखा संगम रसिकांनी अनुभवला. एकामागून एक उत्स्फूर्तपणे विद्यार्थी व्यासपीठावर येत गेले. कुणी प्रेम व्यक्त केले, कुणी सामाजिक विषमतेवर भाष्य केले, कुणी देशप्रेमाची ज्योत शब्दांतून चेतविली, तर कुणी चारोळीच्या चार ओळींतून आयुष्याचा मोठा अर्थ सांगून गेला. प्रत्येक सादरीकरणानंतर उमटणारा टाळ्यांचा कडकडाट हा केवळ दाद नव्हता; तो नव्या प्रतिभेच्या उमलत्या पंखांना मिळालेला आत्मविश्वास होता.

या काव्यमैफिलीचे वैशिष्ट्य म्हणजे कॉलेज कट्टा पुन्हा एकदा विद्यार्थ्यांच्या अभिव्यक्तीचे हक्काचे व्यासपीठ ठरला. वर्गातील धडे आणि परीक्षेच्या चौकटीपलीकडे विद्यार्थ्यांच्या




मनातही एक स्वतंत्र विश्व असते. त्या विश्वाला शब्द देण्याची, भावना व्यक्त करण्याची आणि कल्पनांना आकार देण्याची संधी मिळाली की शिक्षणाला सृजनशीलतेची नवी किनार लाभते. या मैफिलीने नेमके तेच साधले.काव्याच्या या मैफिलीत नांदेड एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष सीए डॉ. प्रवीण पाटील आणि जीएसटीचे सहायक आयुक्त आनंद मुधोळकर यांनीही उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. आपल्या विनोदी शैलीतील रचना सादर करून त्यांनी विद्यार्थ्यांच्या उत्साहात भर घातली. पद, प्रतिष्ठा आणि औपचारिकतेच्या चौकटी बाजूला ठेवून विद्यार्थ्यांसोबत काव्याच्या मैफिलीत सहभागी झाल्याने वातावरण अधिकच आपलेसे झाले. यावेळी प्रा. आनंद थोरात, डॉ. विनोद चव्हाण, डॉ. संदीप गायकवाड, डॉ. कल्पना जाधव, डॉ. आम्रपाली व्यवहारे आणि प्रा. विजय कदम यांनीही आपल्या आवडीच्या कविता व गीतांचे सादरीकरण करून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले.

देशभक्ती, प्रेम, सामाजिक जाणीव आणि मानवी भावभावनांनी नटलेल्या कवितांनी कॉलेज कट्टा रंगतदार झाला. कुठे शब्दांमध्ये विद्रोह होता, कुठे प्रेमाची हळुवार चाहूल होती, कुठे सामाजिक वास्तवाची वेदना होती, तर कुठे स्वप्नांच्या उद्याची आशा होती. शेवटी मैफल सरली. आवाज थांबले. टाळ्यांचा कडकडाटही निवळला; पण कॉलेज कट्ट्यावर उमटलेली तरुण मनांची स्पंदने मात्र बराच वेळ हवेत तरंगत राहिली. काव्यमैफिलीचे सूत्रसंचलन प्रा. विजय कदम यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. विनोद चव्हाण यांनी केले. याप्रसंगी प्रा. डॉ. राजेश सोनकांबळे, डॉ. माया भालेराव, प्रा. संतोष कांबळे, प्रा गंगाधर ताडोड, डॉ. विनायक देव, प्रा. किरण बिचकुंदे, प्रा. आदित्य गोडबोले यांच्यासह कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# भवानीच्या जंगलात शेतकऱ्यावर अस्वलाचा हल्ला

उमरखेड/प्रतिनिधी-तालुक्यातील पैनगंगा अभयारण्यातील भवानी बिटमध्ये शेतात जात असलेल्या ७० वर्षीय शेतकऱ्यावर अस्वलाने हल्ला केल्याची घटना ८ ऑगस्ट रोजी सकाळी साडेसात वाजताच्या सुमारास घडली.



देवराव भिकूमुडे (वय ७०, रा. चिखली, ता. उमरखेड) असे जखमी शेतकऱ्याचे नाव आहे. ते सकाळी चिखली येथून भवानी जवळील माळावरील शेताकडे जात असताना जंगलातील रस्त्यात अस्वलाने अचानक हल्ला चढवून त्यांच्या पाय, हात आणि तोंडावर गंभीर जखमा केल्या. त्यांनी आरडाओरड केल्याने अस्वलाने पळ काढला, त्यामुळे त्यांचे प्राण वाचले. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी त्यांना प्रथम कोरटा प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल केले. प्रकृती चिंताजनक असल्याने प्राथमिक उपचारानंतर त्यांना किनवट उपजिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले आहे. दरम्यान, वनपरिक्षेत्र अधिकारी व्ही.एन. झांबरे (कोरटा) व एस. एस. पांडे (बिटरगाव) यांनी अभयारण्य परिसरात वन्यप्राण्यांचा वावर वाढल्याने शेतकरी व नागरिकांनी सेंच्युरी क्षेत्रात प्रवेश करू नये, अशा सूचना यापूर्वीच दिल्या होत्या. घटनास्थळाचा पंचनामा वनविभागाने केला आहे. या घटनेमुळे भवानी परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे. १५ वर्षांपूर्वीची पुनरावृत्तीः सुमारे १५ वर्षांपूर्वी बोरगाव जंगलाजवळ पैनगंगा नदी ओलांडत असताना जयस्वाल नावाच्या पिता-पुत्रीवर अस्वलाने हल्ला करून त्यांना ठार केले होते. आजच्या घटनेमुळे त्या घटनेची आठवण ताजी झाली आहे.

# बॅनरवरुन खासदारांचा फोटो गायब;शिंदे सेनेत नाराजीची कुजबुज

हदगाव/प्रतिनिधी-नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची निवडणूक पार पडली असली तरी तिचे राजकीय पडसाद आता उघडपणे उमटू लागले आहेत. हिंगोली लोकसभा मतदारसंघाचे खा. नागेश पाटील आष्टीकर यांचे पुत्र कृष्णा पाटील आष्टीकर यांच्या विजयानंतर शिवसेना (शिंदे गट)मध्ये अंतर्गत नाराजीच्या चर्चांना जोर आला आहे.

निवडणुकी दरम्यान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सूचनेनंतर हदगाव विधानसभा मतदारसंघाचे आ.बाबुराव कदम कोहळीकर यांनी अखेरच्या टप्प्यात आपली उमेदवारी मागे घेतली होती. त्यानंतर आ.कोहळीकर, नवनिर्वाचित संचालक अनिल पाटील बाभळीकर, जिल्हाप्रमुख विवेक देशमुख तसेच स्थानिक पदाधिकाऱ्यांनी कृष्णा पाटील आष्टीकर यांच्या समर्थनार्थ सक्रिय भूमिका बजावली.मात्र, विजय मिळाल्यानंतर स्थानिक कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांच्या योगदानाची अपेक्षित दखल घेतली गेली नसल्याची भावना पक्षांतर्गत वाढू लागल्याची चर्चा आहे. काही पदाधिकाऱ्यांनी खासगीत नाराजी व्यक्त केल्याचीही माहिती समोर येत आहे. या पार्श्वभूमीवर, नवनिर्वाचित संचालक अनिल पाटील बाभळीकर यांनी शहरात लावलेल्या आभार प्रदर्शनाच्या बॅनरवरून नवा वाद निर्माण झाला आहे. या बॅनरवर जिल्ह्यातील अनेक प्रमुख नेत्यांचे फोटो झळकले, मात्र खा. नागेश पाटील आष्टीकर यांचा फोटो गायब असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे राजकीय वर्तुळात विविध तर्क-वितर्कांना उधाण आले आहे.हा केवळ योगायोग आहे की जाणीवपूर्वक दिलेला राजकीय संदेश, याबाबत चर्चा रंगत आहेत. विशेष म्हणजे, काही दिवसांपूर्वीच खासदार आष्टीकर यांनी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गट सोडून शिवसेना (शिंदे गट)मध्ये प्रवेश केला होता. मात्र, प्रवेशानंतर अल्पावधीतच समन्वयाऐवजी मतभेदांच्या चर्चांना उधाण आल्याने पक्षातील अंतर्गत स्थितीबाबत




प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.दरम्यान, आगामी सत्तासमीकरणांवर या घडामोडींचा काय परिणाम होणार, याकडे जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. निवडणूक प्रक्रिया संपली असली तरी तिच्या राजकीय परिणामांची चर्चा मात्र अजूनही तापलेली आहे. संबंधित नेत्यांकडून या प्रकरणावर अद्याप कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया आलेली नसल्याने या सर्व चर्चांची स्वतंत्रपणे पुष्टी झालेली नाही.




जागतिक आदिवासी दिनानिमित्त रविवारी शहरातील आयटीआय चौकातून आदिवासी बांधवांनी रॅली काढली होती. या रॅलीत आदिवासी पारंपारिक वेशभुषा परिधान करुन समाजबांधव सहभागी झाले होते.

# संरक्षक कठडा नसलेल्या विहिरीने घेतला अकरा वर्षीय समर्थचा बळी

माहूर/प्रतिनिधी-लसनवाडी येथे संरक्षक कठडा नसलेल्या सार्वजनिक विहिरीत पडून अवघ्या ११ वर्षीय बालकाचा बुडून दुर्दैवी मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना शनिवार, दि.८ ऑगस्ट रोजी सायंकाळच्या सुमारास घडली. समर्थ विकास राठोड असे मृत बालकाचे नाव आहे. या घटनेमुळे लसनवाडी परिसरात शोककळा पसरली असून, सार्वजनिक विहिरीला सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक संरक्षक कठडा का उभारण्यात आला नाही, असा संतप्त सवाल ग्रामस्थांकडून उपस्थित केला जात आहे.



समर्थ हा हनुमान मंदिराजवळील सार्वजनिक विहिरीजवळ असताना तोल जाऊन विहिरीत पडल्याचे सांगण्यात आले. सायंकाळी साडेचारच्या सुमारास गावातील काही लहान मुलांनी समर्थ विहिरीत पडल्याची माहिती त्याच्या कुटुंबीयांना दिली. माहिती मिळताच वडील विकास खंडू राठोड यांच्यासह कुटुंबीय आणि ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेतली. विहिरीत डोकावून पाहिले असता पाण्यावर समर्थची चप्पल तरंगताना दिसली. ग्रामस्थांनी तातडीने मोटारपंप लावून विहिरीतील पाणी कमी करण्याचा प्रयत्न केला. मात्र, विहिरीत मोठ्या प्रमाणात पाणी असल्याने हा प्रयत्न अपुरा ठरला. त्यानंतर ग्रामस्थांनी पाण्यात शोध घेतला असता समर्थ विहिरीत अडकल्याचे आढळून आले. त्याला बाहेर काढून तातडीने माहूर ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. रविवारी, दि. ९ ऑगस्ट रोजी शवविच्छेदन करून मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला. सार्वजनिक ठिकाणी असलेल्या या विहिरीला संरक्षक कठडा नसल्याने लहान मुले तसेच नागरिकांच्या जीविताला धोका निर्माण झाला होता. धोकादायक विहीर प्रशासनाच्या निदर्शनास आली होती का? आली असेल तर सुरक्षेची उपाययोजना का करण्यात आली नाही? असा सवाल आता ग्रामस्थ उपस्थित करीत आहेत. एका निष्पाप बालकाचा जीव गेल्यानंतरच प्रशासनाला जाग येणार का, असा संतप्त सवालही केला जात आहे.

# ओबीसी जात वैधता प्रमाणपत्रावर वाद;फेर चौकशीची मागणी

## शिवाजी आंधळेंनी दिला १५ ऑगस्टपासून उपोषणाचा इशारा

किनवट/प्रतिनिधी-येथील शिवाजी निवृत्तीराव आंधळे यांनी एका व्यक्तीस देण्यात आलेल्या ओबीसी जात वैधता प्रमाणपत्राची फेर चौकशी करून ते रद्द करण्याची मागणी करत जात प्रमाणपत्र पडताळणी समिती,नांदेड यांच्याकडे सविस्तर तक्रार अर्ज सादर केला आहे. या प्रकरणात योग्य न्याय न मिळाल्यास १५ ऑगस्टपासून समितीच्या कार्यालया समोर आमरण उपोषण सुरू करण्याचा इशारा त्यांनी दिला आहे.

अर्जदाराच्या म्हणण्या-नुसार, संबंधित व्यक्तीस देण्यात आलेले ओबीसी जात वैधता प्रमाणपत्र देताना जात प्रमाणपत्र पडताळणी नियम, २०१२ मधील आवश्यक प्रक्रियेचे पालन झाले नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. दक्षता समितीचा अहवाल न घेता अल्पावधीत प्रमाणपत्र देण्यात आल्याचा दावा अर्जात करण्यात आला आहे. तक्रारीत संबंधित व्यक्ती मूळ ओबीसी समाजातील नसून खोटी माहिती, खोटी वंशावळ आणि चुकीचे पुरावे सादर करून समितीची दिशाभूल करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच २२ जुलै रोजीच्या सुधारित कायद्यानुसार



अशा प्रकारे खोटी माहिती देऊन जात प्रमाणपत्र मिळविणे हा फौजदारी गुन्हा असून समितीला स्वयंप्रेरणेने (सुओ-मोटो) चौकशी करून आवश्यक ती कारवाई करण्याचा अधिकार असल्याचे अर्जात नमूद करण्यात आले आहे. अर्जदाराने आपल्या मागण्यांमध्ये संबंधित प्रकरण सखोल चौकशीसाठी दक्षता समितीकडे पाठविणे, चौकशी पूर्ण होईपर्यंत संबंधित व्यक्तीचे जात वैधता प्रमाणपत्र स्थगित करणे, चौकशीत आरोप सिद्ध झाल्यास प्रमाणपत्र रद्द करून भारतीय न्याय संहितेतील (किंवा लागू असलेल्या कायद्यानुसार) फसवणूक व बनावट कागदपत्रांशी संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करणे, शासनाकडून मिळालेल्या सर्व लाभांची व्याजासह वसुली करणे तसेच या प्रकरणात निष्काळजीपणा करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर विभागीय चौकशी करून कारवाई करण्याची मागणी केली आहे. याशिवाय संबंधित व्यक्तीच्या कुटुंबीयांनीही विशिष्ट जातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे शासकीय सेवांचा लाभ घेतल्याचा आरोप अर्जात करण्यात आला असून त्यासंदर्भातील काही कागदपत्रेही तक्रारीसोबत जोडल्याचा दावा अर्जदाराने केला आहे. दरम्यान, या प्रकरणात संबंधित व्यक्ती किंवा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीची अधिकृत भूमिका अद्याप समोर आलेली नाही. तक्रारीतील आरोपांची अधिकृत चौकशी होणे बाकी असून त्यानंतरच वस्तुस्थिती स्पष्ट होणार आहे.

# पुनर्रचित अभ्यासक्रमाच्या अंमलबजावणीसाठी शिक्षकांनी तत्पर राहणे आवश्यक-वसंत मेटकर

कंधार/प्रतिनिधी-नव्या शैक्षणिक वर्षापासून इयत्ता दुसरी, तिसरी, चौथी आणि सहावीच्या पुनर्रचित अभ्यासक्रमाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर शिक्षकांना अभ्यासक्रमातील बदलांची सखोल माहिती मिळावी तसेच नव्या पद्धतीने प्रभावी अध्यापन करता यावे, यासाठी शिक्षकांचे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे.

बाळांतवाडी येथील एस. आर. टी. अध्यापक विद्यालयात तीन टप्प्यांत हे प्रशिक्षण सुरू असून, ११ ऑगस्टपर्यंत शिक्षकांना मार्गदर्शन करण्यात येणार आहे. इयत्ता दुसरीच्या २६४ शिक्षकांचे प्रशिक्षण पूर्ण झाले असून, इयत्ता तिसरी व चौथीसाठी २६४, तर सहावीच्या ११८ शिक्षकांचे प्रशिक्षण सध्या सुरू आहे. या प्रशिक्षणामध्ये अध्यापनाच्या नव्या पद्धती, विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग, अध्ययन निष्पत्ती तसेच प्रत्यक्ष वर्गातील विविध शैक्षणिक कृती यावर विशेष भर दिला जात आहे. पुनर्रचित अभ्यासक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी शिक्षकांनी बदलत्या शैक्षणिक पद्धती आत्मसात करून स्वतःला अपडेट करणे आवश्यक असल्याचे गटशिक्षणाधिकारी वसंत मेटकर यांनी सांगितले. कंधारचे गटशिक्षणाधिकारी वसंत मेटकर यांच्या मार्गदर्शनाखाली विस्तार अधिकारी प्रवीण पाटील, शेख इकबाल, पांडुरंग मुंडे व अविनाश पांचाळ प्रशिक्षणाचे नियोजन व मार्गदर्शन करीत आहेत. केंद्रप्रमुख, साधन व्यक्ती व सुलभक शिक्षक प्रशिक्षणात मार्गदर्शकाची भूमिका बजावत आहेत. या प्रशिक्षणाच्या यशस्वीतेसाठी दत्तात्रेय मंगनाळे, ओमप्रकाश येरमे व कानोजवार परिश्रम घेत आहेत.

# नांदेडमध्ये मंडल आयोग विजय दिन साजरा

नांदेड/प्रतिनिधी-ओबीसी समाजाच्या हक्कांसाठी ऐतिहासिक ठरलेल्या मंडल आयोगाच्या अंमल-बजावणीच्या स्मरणार्थ नांदेड येथे ओबीसी बुद्धिजीवींनी मंडल आयोग विजय दिन साजरा केला.

आयटीआय चौकातील महात्मा फुले स्मारकाजवळ झालेल्या कार्यक्रमात सावित्रीमाई फुले, महात्मा ज्योतिराव फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, मंडल आयोगाचे शिल्पकार बिंदेश्वरी प्रसाद मंडल तसेच तत्कालीन पंतप्रधान विश्वनाथ प्रताप सिंग यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.यावेळी प्रा. गौतम दुथडे यांनी मंडल आयोगाच्या अंमलबजावणीचा इतिहास मांडताना सांगितले की, ओबीसींना मिळालेले आरक्षण हे डॉ. आंबेडकरांनी घटनात्मक तरतुदीतून दिलेल्या अधिकारांवर आणि बी.पी. मंडल यांच्या अहवालावर आधारित असून, त्यासाठी व्ही. पी. सिंग सरकारने मोठे राजकीय बलिदान दिले. त्यामुळे या आरक्षणाचे संरक्षण करण्यासाठी समाजाने सतर्क राहणे आवश्यक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. कार्यक्रमास शाम निलंगेकर, प्रा.डॉ.वनदेव बोरकर, प्रा.डॉ. दत्ता कुंचेलवाड, प्रा. डॉ. आर. डी. शिंदे, प्रा. डॉ. वीरभद्र स्वामी, प्रा. डॉ. विशाल बेलुरे, प्रा.डॉ.प्रकाश कोथळे, अब्दुल कदीर, अब्रार देशमुख, संजय वाघमारे, इंजि. सतीश शिंदे आदी उपस्थित होते.

# जिल्ह्यात जमावबंदी,शस्त्रबंदी आदेश लागू

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड जिल्ह्यात १० ऑगस्टचे ६ वाजेपासून ते २४ ऑगस्ट २०२६ च्यामध्यरात्री पर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश लागू राहणार आहे, अशी माहिती अपर जिल्हादंडाधिकारी कार्यालयाकडून देण्यात आली आहे.

जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी म्हणून अपर जिल्हादंडाधिकारी यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) व (३) अन्वये जिल्ह्यात १० ऑगस्टचे ६ वाजेपासून ते २४ ऑगस्ट २०२६ च्या मध्यरात्री पर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश लागू राहील. त्यानुसार पाच किंवा पाचपेक्षा अधिक व्यक्तींनी या आदेशात नमुद असलेली कृत्ये सार्वजनिक परिसर किंवा त्याच्या जवळपास करण्यास बंदी घालण्यात आली आहे. हा आदेश कामावरील पोलीस अधिकारी, शासकीय कर्मचारी, विवाह, अंत्ययात्रा, धार्मिक कार्यक्रम, यात्रा व इतर सक्षम अधिकारी यांनी विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणुकांना लागू होणार नाही.अशा मिरवणुकांना परवानगी देण्याचे अधिकार तसेच पाच व पाचपेक्षा जास्त इसम जमण्यासाठी, सभा, मिरवणुका, मोर्चा काढणे, ध्वनीक्षेपक वाजविण्यास परवानगी देण्याचे अधिकार जिल्ह्यातील पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना तसेच पोलीस अधीक्षक नांदेड यांनी प्राधिकृत केलेल्या इतर पोलीस अधिकारी यांना राहतील.

# मौजे उमरा येथील जुगार अड्डयावर पोलीसांचा छापा

नांदेड/प्रतिनिधी-मौजे उमरा ता.लोहा येथील शिवारात सुरु असलेल्या जुगार अड्डयावर रविवारी सायंकाळी स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाच्या पोलीसांनी छापा टाकुन नऊ जणांना अटक केली आहे.

मौजे उमरा गावाजवळ जुगाराचा अड्डा सुरु असल्याची माहिती स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाच्या पोलीसांना मिळाली. रविवारी सायंकाळी पोलीसाच्या एका पथकाने जुगार अड्डयावर छापा टाकला. पैसे लावून तिर्रट नावाचा जुगार खेळत असतांना बालाजी गोरेराव शिंदे (वय २७) रा.उमरा व इतर आठ जणांना अटक केली. त्याच्याकडून रोख रक्कम, ८ मोबाईल व जुगाराचे साहित्य असा १ लाख १४ हजार रुपयांचा ऐवज जप्त केला. पोलीस जमादार गणेश देवसरकर यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन उस्माननगर पोलीस ठाण्यात नऊ जणांविरुध्द मुंबई जुगार कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# पेंदा गाव नकाशावर आहे,पण विकासाच्या नकाशावरुन मात्र गायब

उमरखेड/प्रतिनिधी-एकीकडे डिजिटल इंडियाच्या घोषणा सुरू आहेत, तर दुसरीकडे यवतमाळच्या उमरखेड तालुक्यातील पैनगंगा अभयारण्याला लागून असलेले पेंदा हे गाव आजही विकासाच्या नकाशावरून गायब आहे. स्वातंत्र्याला ७९ वर्षे झाली तरी येथे जायला आज साधा कच्चा रस्ताही नाही.मूलभूत सुविधांपासून हे गाव आजही वंचित आहे. रस्ता तर सोडाच, येथे जाण्यासाठी साधी पायवाटही नाही.

पेंदा ते जेवली हे ४ किमीचे अंतर पार करण्यासाठी नागरिकांना घनदाट जंगल, ओढे-नाले तुडवत जीव धोक्यात घालून पायपीट करावी लागते. वाघ, बिबट्या सारख्या हिंस्र प्राण्यांचा परिसरात कायम वावर असल्याने भीतीच्या छायेत नागरिकांना नेहमी जगावे लागते. वाघाने नुकताच एका शेतकऱ्याच्या गायीवर हल्ला केला. रस्त्याअभावी दोन गर्भवती महिलांची बैलगाडीतून नेताना वाटेतच प्रसूतीही झाली होती, असे गावकरी सांगतात असे हे पेंदा गाव.गावकऱ्यांच्या अशा अनेक गंभीर प्रश्नाची दखल घेत बहुजन

> शासनाने पेंदा गावाकडे कायम दुर्लक्ष केले आहे. रस्ता, आरोग्य आणि शिक्षण हा आमचा घटनात्मक हक्क आहे. यासाठी आम्ही संविधानिक मार्गाने तीव्र आंदोलन करू.
> **-इंजि.विद्वान केवटे**

मुक्ती पार्टीचे उमरखेड विधानसभा प्रभारी इंजि. विद्वान केवटे यांनी मुसळधार पावसात कार्यकर्त्यांसह ४ किमी जंगलाची पायवाट तुडवत थेट हे गाव गाठले.त्यावेळी आम्ही माणसे आहोत की नाही, हाच प्रश्न पडतो. आजवर एकही आमदार-खासदार इकडे फिरकला नाही. आमच्या अडचणीत येणारे तुम्ही पहिलेच, अशा भावना गावकऱ्यांनी व्यक्त केल्या.तेव्हा, पेंदा ते जेवली रस्त्याच्या मागणीसाठी लवकरच जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देणार ! असे केवटे यांनी आपले मत व्यक्त केले. यावेळी सुनील वाठोरे, अरविंद राठोड, शेख जब्बार, मिलिंद चिकाटे, मुनव्वर खान यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

CHANGE IN NAME

My (old name) is **ABDUL KHALEEL ABDUL SATTAR** which now I am, changing as (new name) **ABDUL KHALIL ABDUL SATTAR**

Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Sign by
**ABDUL KHALIL ABDUL SATTAR**
R/o 9-4-1097, Bilal nagar Tyre board
Itwara Nanded-431604
M.No.- 8600128111

CHANGE IN NAME

My (old name) is **VYAS MAHESH KUMAR** which now I am, changing as (new name) **MAHESH MOHANLAL VYAS**

Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Sign by
**MAHESH MOHANLAL VYAS**
R/o H.no.4-5-343-1, Ram devi bldg Shrma travals New bridge old mondha Nanded-431604
M.No.- 7077218881

# भोकरच्या रस्त्यावरील अतिक्रमणावर प्रशासनाचा हातोडा

भोकर/प्रतिनिधी- शहरातील मागील अनेक वर्षापासून वाढत चाललेल्या अतिक्रमणामुळे वाहतुकीची कोंडी निर्माण झाली होती. नागरीक विद्यार्थ्यांना रस्त्याने नीट चालता देखील येत नव्हते, दुकानासमोर सामान लावून वाहतुकीस अडथळा निर्माण केल्या जात होता. पंचायत समितीच्या जागेवर व जि. प. केंद्रीय नूतन शाळेच्या जागेवर अतिक्रमण मोठ्या प्रमाणात झाले होते. या सर्व बाबींचा विचार करून प्रशासनाकडून १० ऑगस्ट रोजी अतिक्रमण काढण्याची मोहीम हाती घेऊन सर्व अतिक्रमण करण्यात आले, त्यामुळे शहरातील रस्त्यांनी मोकळा श्वास घेतला असून नागरिकांनी या मोहिमेचे स्वागत केले आहे.

भोकर शहर हे वाढत्या लोकसंख्येचे शहर असून शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण वाढले होते, हॉटेल व इतर दुकाने लावून त्यासमोर सामान ठेवणे, हॉटेल समोर खुर्च्या बेंच लावणे त्यासमोर खाजगी वाहने उभा टाकत होती. अशा



गंभीर परिस्थितीमुळे रस्त्याने चालणे देखील अवघड झाले होते. शाळेतील विद्यार्थ्यांना देखील रस्त्याने चालता येत नव्हते, जि.प.केंद्रीय नूतन शाळेसमोर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण करून शाळेच्या जागेमध्येच काही दुकाने थाटली होती. मटन मार्केटची दुकाने लावून दुर्गंधी पसरून घाण कचरा टाकत असल्याने विद्यार्थ्यांचे आरोग्य धोक्यात आले होते. शहरात वाढत चाललेली वाहतुकीची गंभीर समस्या बनली होती. भोकर शहरातील अतिक्रमण हटविण्यासाठी पंचायत समिती कार्यालय, सार्वजनिक बांधकाम विभाग, यांच्यावतीने ७ ऑगस्ट रोजी अतिक्रमण धारकांना २४ तासांमध्ये आपले अतिक्रमण काढून घेण्याची नोटीस बजावण्यात आली होती. आज दि.१० ऑगस्ट रोजी सकाळी पोलीस प्रशासन, महसूल प्रशासन, नगर परिषद, सार्वजनिक बांधकाम विभाग, वनक्षेत्र कार्यालय या सर्वांनी संयुक्तरीत्या अतिक्रमण काढण्याच्या मोहिमेला सुरुवात केली. जेसीबी मशीन हायवा टेम्पो ट्रॅक्टर यांच्या साह्याने अतिक्रमित जागेवरील दुकाने जमीन दोस्त करण्यात आली. काही अतिक्रमणधारकांनी अडथळा निर्माण करण्याचा प्रयत्न केला मात्र प्रशासनाने कुणालाच दाद दिली नाही. भोकर शहरात मोठ्या प्रमाणावर वाढलेले अतिक्रमण ही अत्यंत गंभीर समस्या बनली होती त्यामुळे वाहतुकीस वारंवार अडथळा निर्माण होत होता. शहरातील अतिक्रमण हटाव मोहिमेसाठी उपविभागीय अधिकारी प्रवीण मेंगशेट्टी, अप्पर पोलीस अधीक्षक अर्चना पाटील, तहसीलदार विनोद गुंडमवार, उपविभागीय पोलीस अधिकारी जगदीश भंडरवाड, हे परिस्थितीवर नियंत्रण ठेवून कायदा सुव्यवस्था सांभाळत होते, भोकर नगर परिषदेचे मुख्याधिकारी ऋषभ पवार, नगरपरिषदेचे सर्व कर्मचारी या मोहिमेसाठी यशस्वी प्रयत्न केले, पोलीस निरीक्षक विश्वंभर पल्लेवाड यांनी तगडा पोलीस बंदोबस्त ठेवला होता सामाजिक परिस्थिती चांगली ठेवून प्रशासनाकडून योग्य कामगिरी करण्यात आली कुणाचाही दुजाभाव न करता अतिक्रमण नियमानुसार काढण्यात यावे अशी अपेक्षा नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

## लोकसभा अध्यक्षांना सुप्रीम कोर्टाची नोटीस; ६ खासदारांच्या विलीनीकरणावर स्थगितीस नकार

नवी दिल्ली: शिवसेनेच्या मशाल चिन्हावर निवडून आलेल्या सहा खासदारांच्या विलीनीकरण संदर्भात सर्वोच्च न्यायालयाने आज खा.नागेश पाटील आष्टीकर, बंडू जाधव यांच्यासह सहा खासदार व लोकसभा अध्यक्षांना नोटीस बजावली आहे. या सहा जणांच्या शिंदे गटातील विलिनीकरणास स्थगिती देण्यास सर्वोच्च न्यायालयाने नकार दिला आहे.

काही दिवसांपूर्वी शिवसेना ठाकरे गटाचे खा.नागेश पाटील आष्टीकर, ओमप्रकाशराजे निंबाळकर संजय दिना पाटील, संजय देशमुख, संजय जाधव, भाऊसाहेब वाकचौरे या सहा खासदारांनी ठाकरेंच्या शिवसेनेला 'जयमहाराष्ट्र' करत शिंदे सेनेत विलीन होण्याचा निर्णय घेतला होता. या निर्णयाला लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी मान्यता दिली होती. या संदर्भात न्यायमूर्ती पी. एस. नरसिंहा आणि न्यायमूर्ती अलोक अराधे यांच्या खंडपीठासमोर ठाकरे गटाने लोकसभा अध्यक्षांच्या निर्णयाला आव्हान देत तातडीने स्थगिती देण्याची मागणी करणारी याचिका केली होती. परंतु न्यायालयाने अंतरिम दिलासा नाकारत सर्व संबंधित प्रतिवादींना नोटीस जारी करण्याचे आदेश दिले.ठाकरे गटातर्फे ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल आणि देवदत्त कामत यांनी बाजू मांडताना, पक्षाच्या संमतीशिवाय सहा खासदारांनी घेतलेला निर्णय हा दहाव्या अनुसूचीचा भंग असल्याचा युक्तिवाद केला. लोकसभा सचिवालयाच्या निर्णयामुळे गटाचे संख्याबळ ९ वरून ३ वर आल्याचेही त्यांनी निदर्शनास आणले.दरम्यान, शिंदे गटातर्फे ज्येष्ठ वकील नीरज किशन कौल यांनी सविस्तर उत्तर सादर करण्यासाठी वेळ मागितला. सर्वोच्च न्यायालयाने लोकसभा अध्यक्षांचे कार्यालय आणि संबंधित खासदारांना दोन आठवड्यांत उत्तर सादर करण्याचे आदेश दिले असून, पुढील सुनावणी त्यानंतर होणार आहे. त्यामुळे या विलीनीकरणाचे भवितव्य न्यायालयाच्या अंतिम निर्णयावर अवलंबून राहणार आहे.



नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या उपाध्यक्षपदी डॉ.मिनल पाटील खतगावकर यांची बिनविरोध निवड झाल्यानंतर त्यांनी माजी मुख्यमंत्री खा.अशोक चव्हाण यांची भेट घेवून त्यांचे आभार मानले. यावेळी माजी मंत्री डी.पी.सावंत, माजी आ.ओमप्रकाश पोकर्णा, माजी उपमहापौर सरजितसिंघ गिल व इतर उपस्थित होते. (छाया : करणसिंह बैस)

## सुजलेगाव शिवारातील जुगार अड्डयावर पोलीसांची धाड

नांदेड/प्रतिनिधी-नायगाव तालुक्यातील सुजलेगाव शिवारात सुरु असलेल्या जुगार अड्डयावर पोलीसांनी धाड टाकुन पाच जणांना अटक करण्यात आली.

सुजलेगाव शिवारात जुगाराचा अड्डा सुरु असल्याची माहिती कुंटूर पोलीसांना मिळाली. सहाय्यक पोलीस निरिक्षक श्री. भोसले यांच्या नेतृत्वाखाली पोलीसाच्या पथकाने जुगार अड्डयावर धाड टाकली. पैसे लावून तिर्रट नावाचा जुगार खेळत असतांना रवीराज उत्तम जुकरे (वय २७) रा.सुगाव ता.देगलूर, सुनील माधवराव उचे (वय २५) रा.करेमलकापूर ता.देगलूर, साईराज रामकिशन कदम (वय २९), अभिषेक योगेश्वर हारगे (वय २७), लक्ष्मण किशनराव तरकंटे (वय ३३) सर्व रा.सुजलेगाव यांना रंगेहाथ पकडले. पोलीसांनी घटनास्थळावरुन २१ हजार रुपये रोख, एक बुलेट, चार मोबाईल, जुगाराचे साहित्य असा ३ लाख १३ हजार रुपयांचा ऐवज पोलीसांनी जप्त केला. या प्रकरणी पाच जणांविरुध्द कुंटूर पोलीस ठाण्यात मुंबई जुगार कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## आदिवासी विद्यार्थ्यांना निर्बंधांचा फटका;किनवट येथे विद्यार्थ्यांमध्ये संताप

किनवट/प्रतिनिधी- शासकीय आदिवासी वसतिगृहे व आश्रमशाळेत प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना आता कोणत्याही आंदोलनात, उपोषणात अथवा सामाजिक संघटनांच्या कार्यात सहभागी होण्यास मनाई करणारा महाराष्ट्र शासनाचा अध्यादेश हा विद्यार्थ्यांच्या अस्तित्वाच्या मुळावरच घाव घालणारा असल्याने तमाम विद्यार्थीवृंद आज (१० ऑगस्ट) प्रकल्प कार्यालयासमोर रस्त्यावर उतरला आहे.

अखिल भारतीय आदिवासी विकास परिषदेचे नेते विकास कुडमते यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी संघटनेचेच्या पदाधिकारी आणि प्रकल्प कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील शेकडो विद्यार्थ्यांनी प्रकल्प अधिकाऱ्यांना निवेदन दिले. प्रवेशासाठी शैक्षणिक वयाची मर्यादा आणि शिक्षणातील अपरिहार्य खंड असलेल्या विद्यार्थ्यांना वसतिगृह प्रवेश नाकारण्याची अन्यायकारक तरतूद करण्यात आलीय. तो आदेश रद्दबातल करावा अन्यथा १४ ऑगस्ट पासून नांदेड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन छेडण्याचा गर्भीत इशारा विद्यार्थ्यांच्या वतीने देण्यात आला आहे. आर्थिक, कौटुंबिक किंवा आरोग्यविषयक कारणांमुळे अनेकदा आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षणात खंड पडतो. अशा विद्यार्थ्यांना वसतिगृह प्रवेशापासून वंचित ठेवणे म्हणजे त्यांचा पुढील शिक्षणाचा मार्ग रोखण्या सारखे आहे. शिवाय, लोकशाही मार्गाने आपल्या न्याय्य हक्कांसाठी आवाज उठवण्याच्या घटनात्मक अधिकारावरही या आदेशामुळे जुलूमशाही केली जात आहे. म्हणून शेकडो विद्यार्थी कोठारी येथील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयासमोर रस्त्यावर उतरले आहेत. शासन निर्णय क्र.आवगृ-१३२५/प्र.क्र.१५४/का.१२/दि.५ ऑगस्ट २०२६ तत्काळ मागे घेण्यात यावा, विद्यार्थ्यांना आंदोलन, उपोषण किंवा




संघटनांमध्ये सहभागी होण्यास प्रतिबंध करणाऱ्या अटी त्वरित रद्द कराव्यात, शैक्षणिक वयाची मर्यादा आणि शिक्षणातील खंडासंदर्भातील विद्यार्थीविरोधी नियम पूर्णपणे हटवण्यात यावेत, विद्यार्थी, पालक, विद्यार्थी संघटना आणि तज्ज्ञांशी चर्चा करून विद्यार्थीहिताचा नवीन व सुधारित शासन निर्णय जारी करण्याच्या मागणीचे निवेदन मंथन युवराज वाळके (जिल्हाध्यक्ष, नांदेड) यांच्यासह विलास ढोले, रूपेश कुडमते, नागेश मेश्राम, आकाश कोहचाडे, अभय तलांडे, शुभम धुर्वे, सचिन गमेवाड आणि राम येलकेवाड यांच्यासह शेकडो विद्यार्थ्यांनी सोपवल्याचे सांगितले.

## हदगावमध्ये चिडीमार पथक कार्यान्वित करण्याची मागणी

हदगांव/प्रतिनिधी-शहरात शाळा-महाविद्यालये सुरू झाल्यानंतर काही तरुणांकडून दुचाकीवरून कर्णकर्कश हॉर्न वाजवत तसेच वेगाने वाहन चालविण्याचे प्रकार वाढले आहेत. शाळा-महाविद्यालय परिसरात अशा हुल्लडबाज तरुणांवर नियंत्रण ठेवण्यासाठी पोलिसांनी स्वतंत्र चिडीमार पथक कार्यान्वित करावे, अशी मागणी पालक व नागरिकांमधून होत आहे.

शहरात ग्रामीण भागातून मोठ्या संख्येने विद्यार्थी-विद्यार्थिनी शिक्षणासाठी येतात. शाळा व महाविद्यालय सुटल्यानंतर तामसा रोड, कला व वाणिज्य महाविद्यालय परिसर, तामसा टी पॉइंट, आझाद चौक, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले परिसर, जिप हायस्कूल ग्राउंड तसेच शाळा सुटल्यानंतर बस्थानक मध्ये शहरातील प्राथमिक शाळांच्या परिसरात काही तरुण दुचाकीवरून फेरफटका मारताना दिसून येतात. या तरुणांकडून कर्णकर्कश हॉर्न वाजवणे, दुचाकी वेगाने चालविणे तसेच सुसाट वेगाने वाहने पळविणे असे प्रकार केले जात असल्याच्या तक्रारी आहेत. विशेष म्हणजे, या प्रकारां विरोधात तक्रार करण्यास विद्यार्थी व पालकही अनेकदा धजावत नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे शाळा-महाविद्यालय परिसरात विद्यार्थिनींची मोठी वर्दळ असते. त्यामुळे अशा हुल्लडबाज तरुणांच्या वाहनांवर पोलिसांनी कारवाई करून परिसरात शिस्त निर्माण करावी, अशी मागणी जोर धरत आहे. कर्णकर्कश हॉर्नमुळे नागरिक त्रस्त असून शहरातील विविध भागांत विनाकारण हॉर्न वाजविण्याचे प्रकार वाढले आहेत. यामुळे ज्येष्ठ नागरिक, नवजात बालके तसेच रस्त्यावरील नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकांवर दंडात्मक कारवाई करण्याची गरज आहेशाळा-महाविद्यालय परिसरात पोलिसांनी नियमित गस्त वाढवून चिडीमार पथक सक्रिय करावे हुल्लडबाज तरुणांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी पालक, विद्यार्थी आणि नागरिकांकडून होत आहे.

## भंगार वेचणाऱ्या इसमाच्या खून प्रकरणी एकास अटक

नांदेड/प्रतिनिधी-बाफना परिसरात गुरुवारी रात्री भंगार वेचणाऱ्या एका इसमाचा खून केल्याची घटना घडली होती. याप्रकरणी इतवारा पोलीसांनी एका आरोपीस अटक केली आहे. बाफना परिसरातील संगमकार बाजार दुकानासमोर एक इसम मृत अवस्थेत आढळून आला होता. त्याच्या डोक्यावर गंभीर वार केल्याने जखम झाल्याचे निदर्शनास आले. याप्रकरणी इतवारा पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपी विरुध्द खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीसांनी अनोळखी मयताची ओळख पटविण्यात यशस्वी झाले. मयताचे नाव मंगल शंकर गवळी रा.लोढेसांगवी, ता.लोहा असून तो भंगार वेचून आपला उदरनिर्वाह करीत असत. गुरुवारी रात्री भंगार वेचण्याच्या कारणावरुन मंगल गवळी याच्या डोक्यावर पेवर ब्लॉकच्या दगडाने वार करुन खून केला. याप्रकरणी इतवारा पोलीसांनी सुजल उर्फ सुजीत सुनील पोटभरे रा.श्रावस्तीनगर,नांदेड यास अटक केली असून आणखी दोन आरोपीचा शोध सुरु आहे.

पान १ वरुन

### रांचीत विद्यार्थ्यांवर...

पोलिसांनी अश्रूधुराच्या नळकांड्या फोडल्या आणि पाण्याच्या फवाऱ्याचा वापर केला. आंदोलनाचे नेतृत्व करणारे विद्यार्थी नेते देवेंद्र महतो म्हणाले, आज राज्याच्या मुख्यमंत्र्यांचा वाढदिवस आहे. परंतु, वाढदिवसाच्या दिवशी विद्यार्थ्यांना अश्रूधूर आणि वॉटर कॅनॉनची भेट देऊन झारखंड सरकार राज्याला कलंकित करत आहे. हा जनसमुदाय पाहून सरकार घाबरले असून हीच गर्दी सरकारची खुर्ची हलवून सोडेल. आता आम्ही कोणत्याही शिष्टमंडळाशी नाही, तर थेट मुख्यमंत्र्यांशीच चर्चा करणार आहोत. जर सरकारला आपली खुर्ची वाचवायची असेल तर आमच्या सर्व मागण्या मान्य कराव्या लागतील. भरती प्रक्रियेतील अनियमितता प्रकरणी सीआयडीने मोठी कारवाई करत जेपीएससीचे माजी अध्यक्ष एल. ख्यांगते यांना अटक केली आहे.

### इंदरजितसिंघ बावरी खून...

याप्रकरणी मयताच्या चुलत भावाने दिलेल्या तक्रारीवरुन नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात आरोपींविरुध्द विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलीस अधीक्षक डॉ.निलाभ रोहन यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हा अन्वेषण विभाग व नांदेड ग्रामीण पोलीस स्टेशनचे अधिकारी व कर्मचारी आरोपींचा शोध घेत होते. पोलीसांनी घटनास्थळ परिसरातील सीसीटीव्ही कॅमेरे व तांत्रिक माहितीच्या आधारे आरोपींच्या अटकेसाठी पोलीसांचे पथक स्थापन केले होते. स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाचे पोलीस निरिक्षक अतुल भोसले यांच्या नेतृत्वाखाली पोलीसांनी आरोपी दिलीप पुंडलिक डाकोरे (वय ३३) रा.शंभरगाव ह.मु. रवीनगर,कौठा, कृष्णा दिगंबर बारोळे (वय २९) रा.किवळा, रणजित उर्फ रंज्या चांदु सूर्यवंशी रा.गोवर्धनघाट टेकडी,नांदेड, ज्योती जगदीश बिगानिया (वय ४०) रा. रवीनगर,कौठा व एका विधिसंघर्षग्रस्त बालकास पोलीसांनी अटक केली आहे. इंदरजितसिंघ बावरी याचा खून पुर्ववैमनस्यातून व कट रचून करण्यात आल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले.

## चूक मान्य करा,नाहीतर तीव्र आंदोलन;जरांगे पाटलांचा इशारा

सांगली:मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर राज्यातील वातावरण पुन्हा तापण्याची चिन्हे दिसत असून मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी सरकारला थेट इशारा दिला आहे. अजूनही वेळ गेलेली नाही. मंत्र्यांची चूक मान्य करून ती तात्काळ दुरुस्त करा, अन्यथा यापेक्षाही मोठं आणि तीव्र आंदोलन छेडू, असा इशारा त्यांनी दिला.

सांगली येथे माध्यमांशी बोलताना जरांगे पाटील म्हणाले की, कुणबी प्रमाणपत्र रद्द करण्यासाठी दिलेले आदेश त्वरित मागे घ्यावेत. मराठा समाजावर जाणूनबुजून अन्याय केला जात असून आरक्षणाच्या प्रक्रियेत अडथळे निर्माण केले जात आहेत. मराठा समाजाने आता जागं होणं गरजेचं आहे. आपली लढाई आपल्यालाच लढावी लागणार आहे, असे आवाहन त्यांनी केले. राज्याच्या दौऱ्यावर असलेले जरांगे पाटील सध्या विविध भागांत समाजाशी संवाद साधत आंदोलनाची रणनीती स्पष्ट्श करत आहेत. येत्या २९ ऑगस्ट रोजी निर्णायक आंदोलन छेडण्याची घोषणा त्यांनी केली असून त्या पार्श्वभूमीवर त्यांचे दौरे सुरू आहेत.

पान १ वरुन

### माहूरच्या आदिवासी मुलांचे...

आदिवासी विद्यार्थ्यांच्या कल्याणासाठी दरवर्षी विविध योजनांच्या माध्यमातून निधी उपलब्ध होतो. मग माहूरच्या विद्यार्थ्यांना मूलभूत सुविधांसाठी संघर्ष का करावा लागत आहे? वसतिगृहाची इमारत वर्षानुवर्षे भाड्याच्या अवस्थेत का आहे? भाडे नऊ वर्षे थकीत कसे राहिले? विद्यार्थ्यांची संख्या कमी होत असल्यास त्यामागील कारणांचा शोध प्रशासनाने घेतला का? या सर्व प्रश्नांची स्वतंत्र आणि निष्पक्ष चौकशी होणे गरजेचे आहे. केवळ कागदावर सुविधा उपलब्ध असल्याचे दाखवून आदिवासी विद्यार्थ्यांच्या वास्तवाकडे दुर्लक्ष करणे आता थांबले पाहिजे. तुकाराम मुंडे यांच्या धडक प्रशासकीय कार्यपद्धतीची आठवण करून देणाऱ्या या प्रकरणात आदिवासी विकास विभागानेही कागदावरील अहवालांपेक्षा प्रत्यक्ष परिस्थितीला प्राधान्य द्यावे. विद्यार्थ्यांना सुरक्षित इमारत, स्वच्छ परिसर, शुद्ध पाणी, दर्जेदार भोजन आणि आवश्यक मूलभूत सुविधा मिळणे हा त्यांचा हक्क असल्याने माहूर येथील वसतिगृहात शिक्षण घेणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांच्या समस्ये कडे लक्ष देण्याची नितांत आवश्यक्ता आहे.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४